२२८

अतिवृष्टी /नैसर्गिक आपत्तीमुळे पिडीत झालेल्या आदिवासी कुटुंबांना न्युक्लिअस बजेट मधून आर्थिक मदत करणेबाबत

महाराष्ट्र शासन
आदिवासी विकास विभाग
शासन निर्णय क्रमांक न्युबयो २००६/प्र.क्र.६३ /का.५
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक - ४ सप्टेंबर , २००६

वाचा :- १) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र . न्युबयो २०००/प्र क्र १४४ अ / का. ५, दिनांक ३१ मे, २००१ .
२) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र . न्युबयो २००५/प्र क्र ८८ / का. ५, दिनांक १८ ऑगस्ट , २००५.
३) शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र . न्युबयो २००६/प्र क्र ६३ / का. ५, दिनांक २६ जुलै, २००६.
४) आयुक्त, आदिवासी विकास, नाशिक यांचे पत्र क्र. विकास-२००६/न्युबयो/प्र.क्र.१६/का-३(१), दिनांक २३ ऑगस्ट, २००६.

प्रस्तावना :- अतिवृष्टी /नैसर्गिक आपत्तीमुळे पिडीत झालेल्या आदिवासी कुटुंबांना न्युक्लिअस बजेट मधून आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने आपदग्रस्त आदिवासी कुटुंबांना शासन निर्णय क्र. न्युबयो २०००/प्र क्र १४४ अ/का. ५, दिनांक ३१ मे, २००१ मधील परि. क्र. ४ ड च्या अधिन राहून न्युक्लिअस बजेट या योजनेमधून जीवनावश्यक वस्तुंची खरेदी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आदिवासी कुटुंबांना पुरविण्यासाठी प्रति आपदग्रस्त कुटुंबास रु. ४५००/- चे पॅकेज अनु. क्र ३ वरील दिनांक २६ जुलै, २००६ च्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आले होते.

आयुक्त, आदिवासी विकास,नाशिक यांनी त्यांच्या संदर्भाधिन अनु.क्र ४ वरील पत्रान्वये पॅकेजमधील बाबींच्या अंदाजित किंमत, बाबवार मदत देण्याच्या बाबतीत आवश्यक बदल, पॅकेज मधील बाबींच्या खरेदीच्या कार्यपध्दतीबाबत व यंत्रणेबाबत काही आवश्यक बदल प्रस्तावित केले आहेत.

वरील बाबी लक्षात घेऊन अतिवृष्टी /नैसर्गिक आपत्तीग्रस्तच्या काळात आदिवासी आपदग्रस्त कुटुंबांना तातडीने मदत देण्याच्या अनु. क्र ३ वरील शासन निर्णयात बदल करण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्या अनुषंगाने शासनाने खालील प्रमाणे बदल करण्याचा निर्णय घेतला आहे :-

शासन निर्णय :- यापुढे अतिवृष्टी /नैसर्गिक आपत्तीग्रस्त पिडीत झालेल्या आदिवासी आपदग्रस्त कुटुंबांना शासन निर्णय क्र. न्युबयो २०००/प्र क्र १४४ अ / का. ५, दिनांक ३१ मे, २००१ मधील परि. क्र. ४ ड च्या अधिन राहून न्युक्लिअस बजेट या योजनेमधून खालील जीवनावश्यक वस्तुंची खरेदी विहित कार्यपध्दतीचा अवलंब करुन आदिवासी कुटुंबांना पुरविण्यासाठी प्रति आपदग्रस्त कुटुंबास रु. ४५००/- च्या मर्यादेत किंवा झालेल्या नुकसानीइतकी भरपाई यापैकी जे कमी असेल ते मंजूर करण्यास शासन मंजूरी देत आहे.

| अ.क्र | वस्तूचे नाव | एकूण अंदाजित किंमत ( रुपये ) |
|---|---|---|
| १ | अन्नधान्य (तांदूळ) (गहू) | ८००/- |
| २ | तूरडाळ | २००/- |
| ३ | मिरची, मिठ, मसाला, गोडेतेल | ३००/- |
| ४ | वातीचा स्टोव्ह | २५०/- |
| ५ | कंदील | १३०/- |
| ६ | स्टील हंडा | २००/- |
| ७ | २ स्टीलची ताटे | ६० /- |
| ८ | २ ग्लास | ३० /- |
| ९ | २ ताटल्या ( मध्यम आकार खोलगट ) | ३० /- |



जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
शाखा - GB
आवक नं.

| | | | |
|---|---|---|---|
| १० | २ पातेले ( मोठे व लहान ) | | २५०/- |
| ११ | २ स्टीलचे डब्बे ( १० किलोसाठी) | | २५०/- |
| १२ | १ तवा | | १००/- |
| १३ | १ प्लास्टीक बादली व २ मग | | १५०/- |
| १४ | २ चादरी २ सतरंजी (३ x ६) | | ५००/- |
| १५ | चटई (४ x ६) | | १५०/- |
| १६ | कपडे २ लुगडी | | ३००/- |
| १७ | एक टोपेल | | ५०/- |
| १८ | पॉलिथीन शिट (छप्परासाठी) | | २००/- |
| १९ | ४ प्लास्टीक बरणी | | १५०/- |
| २० | रोख रक्कम | | ४००/- |
| | एकूण | | ४५००/- |

२. जिल्हाधिका-यांनी केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारे अतिवृष्टी /नैसर्गिक आपत्तीग्रस्त आदिवासी कुटुंबाची यादी संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी प्राप्त करुन घ्यावी. सदर यादीतून अतिवृष्टी /नैसर्गिक आपत्तीग्रस्त आदिवासी कुटुंबाची स्वतंत्र यादी तयार करुन सदर कुटुंबांना या योजनेंतर्गत लाभ देण्यासाठी आवश्यक मागणी संबंधित प्रकल्प अधिकारी यांनी महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांच्याकडे नोंदवावी.

३. महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक यांनी आश्रमशाळा, खावटी कर्ज योजना अंतर्गत खरेदीसाठी असलेल्या प्रचलित विहित कार्यपध्दतीनुसार प्राप्त मागणीच्या अनुषंगाने वर नमूद अन्नधान्यांची व साहित्याची खरेदी करावी व मागणीप्रमाणे संबंधित प्रकल्प अधिकारी यांना अन्नधान्य व साहित्य सुपूर्द करावे. प्रकल्प अधिकारी यांनी त्यांनतर अतिवृष्टी /नैसर्गिक आपत्तीग्रस्त आदिवासी कुटुंबांना त्यांनी केलेल्या स्वतंत्र यादीप्रमाणे सदर योजनेचा लाभ द्यावा. याप्रमाणे प्रकल्प अधिकारी यांनी आपदग्रस्त आदिवासी कुटुंबांना योजनेचा लाभ देण्याची कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती आयुक्त, आदिवासी विकास, अपर आयुक्त आदिवासी विकास व शासनास वेळोवेळी सादर करावी.

४. सदर योजनेवरील खर्च न्युक्लिअस बजेट योजनेंतर्गत उपलब्ध करुन दिलेल्या अनुदानातून भागविण्यात येऊन तो मागणी क्र. टी ५ , २२२५- अनुसूचित जाती / अनुसूचित जमाती व इतर मागासवर्गीयांचे कल्याण ०३ जनजाती उपयोजना क्षेत्राकरिता केंद्रवर्ती अर्थसंकल्प - २० इतर खर्च (०१)(०१) राज्य योजनांतर्गत योजना ( २२२५ १७०४) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर मदत महसूल व वन विभागामार्फत देय असलेल्या मदतीव्यतिरिक्त असेल.

६. शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र . न्युबयो २००६/प्र क्र ६३ / का. ५, दिनांक २६ जुलै, २००६ रद्द करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक २००६०८२४१४५९४७००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( र. प्र. आटे )
उप सचिव

प्रति,